नगरपरिषद कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व इतर लाभ देणेबाबत. (13)

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३०
आदेश क्र.नपप्रसं/निवृत्ती लाभ/२००५/प्र.क्र.८२५/२५

३० डिसेंबर २००५

वाचा :- १. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.इएसटी ११८४/प्र.क्र.२१/६, दिनांक १४.५.१९८४

२. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.डब्ल्यूपी २००३/प्र.क्र.४/२००३/८/, दिनांक २२.३.२००४

३. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे क्र.नपप्रसं/म.ना.से.अनुज्ञेय लाभ/२००४/प्र.क्र.७५९/५, दिनांक ८.२.२००५

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये मा.आयुक्त तथा संचालक यांना असलेले अधिकार

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.इएसटी ११८४/प्र.क्र.२१/६, दिनांक १४.५.१९८४ अन्वये राज्यातील नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूदीनुसार निवृत्ती वेतन व उपदान (ग्रॅच्युएटी) लाभ अनुज्ञेय होतात.

तथापि काही नगरपरिषदांमधील सेवानिवृत्त कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूदीनुसार निवृत्ती वेतनाच्या लाभाशिवाय केंद्र शासनाच्या पेमेंट ऑफ ग्रॅच्युएटी ॲक्ट १९७२ नुसार ग्रॅच्युएटीचा लाभ मिळण्याबाबत नगरपरिषदेकडे आग्रह धरतात असे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आवक क्र. २५५६
दिनांक ३० / १ / २००६

मुख्याधिकारी
नगरपरिषद

FILENAME gratuity

<u>आ दे श</u>

सर्व नगरपरिषदांना कळविण्यात येते की, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतुदीनुसार निवृत्ती वेतन व उपदानाचे लाभ द्यावेत. पेमेंट ऑफ ग्रॅच्युएटी ॲक्ट १९७२ नुसार ग्रॅच्युएटीचा उपदानाचा लाभ मागणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन अनुज्ञेय होणार नाही. अर्जदाराने केंद्र शासनाच्या पेमेंट ऑफ ग्रॅच्युएटी ॲक्ट १९७२ नुसार मागणी केल्यास उक्त दोन्ही पैकी एकच लाभ अनुज्ञेय होईल याची त्यांना स्पष्ट जाणीव द्यावी व नगरपरिषदेने या दोन्हीपैकी एकच लाभ त्यांना देण्याची दक्षता घ्यावी.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति :-

१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
३. उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
४. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई (सर्व कार्यासन)
६. निवडक फाईल.